महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

मंगळवार ■ १५ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०२४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# जयंत पाटील भाजपच्या वाटेवर? पडद्यामागे जोरदार हालचाली



**राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चेने जोर धरला आहे. 'एबीपी माझा'ने दिलेल्या वृत्तानुसार, जयंत पाटील यांच्या भाजप प्रवेशाबाबत बोलणी अंतिम टप्प्यात आहेत. मात्र, त्यांना हव्या असलेल्या मंत्रिपदावरून काही अडचणी येत असल्यामुळे प्रवेश रखडल्याची शक्यता आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात काहीही घडू शकतं. त्यामुळे आगामी काळात काहीतरी मोठं घडणार असल्याचे संकेत मिळत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे आगामी काळात भाजपात प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. या चर्चांमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. विशेष म्हणजे पडद्यामागे तशा घडामोडी घडत आहेत. 'एबीपी माझा'ने सूत्रांच्या हवाल्याने याबाबतचं वृत्त दिलं आहे. जयंत पाटील आणि भाजप यांच्यात एकमत झालं आणि पक्षप्रवेशाचं निश्चित झालं तर महाराष्ट्राच्या राजकारणातला हा नवा भूकंप मानला जाणार आहे. जयंत पाटील हे खरंतर ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे अतिशय विश्वासू आणि जवळचे सहकारी आहेत. ते अनेक वर्षांपासून शरद पवारांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

जयंत पाटील भाजपात जाणार असल्याच्या चर्चांना उधाण येण्याचं टायमिंग देखील महत्त्वाचं आहे. जयंत पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्याची चर्चा आहे. त्यांच्या राजीनाम्याची काल चांगलीच चर्चा होती. पण त्यानंतर आमदार जितेंद्र आव्हाड आणि नंतर खासदार सुप्रीया सुळे यांनी वृत्ताचं खंडन केलं. जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिलेला नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. पण तरीसुद्धा दुसऱ्या बाजूला जयंत पाटील यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चांना उधाण आलं आहे. विशेष म्हणजे सर्वकाही ठरलं आहे. आता केवळ टॉपच्या खात्याचं मंत्रिपद मिळालं तर जयंत पाटील हे भाजपात प्रवेश करतील, अशी चर्चा आहे. असं असलं तरी हे सगळं भाजपच्या पक्षश्रेष्ठींवर अवलंबून असल्याची देखील माहिती आहे.

**"भाजप पक्षात प्रवेश करण्यासाठी कुणी मला विचारलेलं नाही आणि मी कुणाला तशी विनंती केलेली नाही. एखादा प्रदेशाध्यक्ष असणारा माणूस, त्याच्याबाबत एवढ्या वावड्या उठणे, तो कोणत्या पक्षात जात आहे, याबाबत तुम्हीच सगळे ठरवायला लागले. मला आश्चर्य वाटतं. मला आताच सहाय्यकाने बातमी पाठवली की, बातम्या चालू आहे. मलाही आश्चर्य वाटतंय. सूत्र कुठे आहेत मला दाखवा जरा. मला त्या सूत्रालाच भेटायचं आहे. असं कधी असतं का?", असं जयंत पाटील म्हणाले.**

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याबाबत सध्या विविध चर्चांना उधाण आलं आहे. जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्याची चर्चा दोन दिवसांपासून सुरु आहे. अर्थात खासदार सुप्रिया सुळे यांनी या वृत्ताचं खंडन केलं आहे. तसेच या चर्चांनंतर जयंत पाटील हे भाजपात प्रवेश करणार असल्याच्या चर्चांनेदेखील जोरदार उधाण आलं. याबाबत उलटसुलट चर्चांना उधाण आल्यानंतर अखेर जयंत पाटील हे माध्यमांसमोर आले. त्यांनी आपल्याबाबत सुरु असलेल्या विविध चर्चांवर स्पष्टीकरण दिलं आहे. आपण प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा दिलेला नाही. तसेच आपण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष असून भाजपात प्रवेश करणार असल्याचं वृत्त खोटं आहे, असं जयंत पाटील यांनी स्पष्ट केलं.**

## थोडक्यात महत्वाचे



## आदिवासी मजुराला बेदम मारहाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी ।** जुन्या वादाच्या रागातून एका शेत मजुरीचे काम करणाऱ्या आदिवासी कामगाराला जातीवाचक शिवीगाळ करून त्यास तिघा सख्ख्या भावांनी आपसात संगनमताने बेदम मारहाण केल्याची घटना भिवंडी तालुक्यातील पाये गावातून समोर आली आहे. याप्रकरणी तिघांच्या विरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाल्या अरुण मुकादम, मंदार अरुण मुकादम, मनिष अरुण मुकादम अशी गुन्हा दाखल झालेल्या भावांची नावे आहेत. तर परश्या पवार असे जखमी आदिवासीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार तक्रारदार परश्या हा पाये येथील नाईक पाड्यात पत्नी आणि एका मुलीसह राहत असून शेत मजुरीवर उपजीविका करीत आहे.

दरम्यान जून महिन्याच्या शेवटी परश्याचा चुलत भाऊ संतोष पवार याच्याशी आरोपीत तिघा भावांचा मजुरीच्या कारणावरून वाद होऊन भांडण झाले होते.त्यावेळी तिघा भावांनी संतोषला मारहाण करून त्याची दुचाकीची तोडफोड केली होती.त्यानंतर सदर भांडण परश्याच्या मध्यस्थीने मिटले होते. परंतु याच भांडणाचा राग मनात धरून ११ जुलै रोजी परश्या हा त्याचे नातेवाईकासोबत दुचाकीने सायंकाळी साडे पाच वाजताच्या सुमारास पाये नाक्यावर भाजी आणण्यासाठी जात असतानाच वरील तिघांनी त्यास रस्त्यात अडवून जातीवाचक शिवीगाळसह गाडीच्या चावीने तसेच ठोश्यांनी बेदम मारहाण केली. या घटनेची माहिती श्रमजीवी संघटनेचे हैदर कासट यांना मिळाल्यानंतर त्यांनी तालुका अध्यक्ष सागर देसक,गुरुनाथ वाघे,अमोल मुकणे,शिवदास मांगात,किशोर हुमणे,नीता घरत व नाईक पाडा येथील २५ ते ३० सभासद यांच्यासह तालुका पोलीस ठाणे गाठून पोलीस ठाण्यात परश्याच्या फिर्यादीवरून दिलेल्या तक्रारीवरून बाल्या, मंदार, मनिष या तिघांच्या विरोधात अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे.

## महावितरणची मनमानी
### कल्याणमध्ये अघोषित भारनियमन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. १४ (बातमीदार):** काही दिवसांपूर्वी पडघा येथून पाल सबस्टेशनला होणारा विद्युतपुरवठा खंडित झाल्याने कल्याणमधील वीजसेवा काही तासांसाठी विस्कळित झाली होती. विद्युतपुरवठा करणारे दोन्ही फीडर निकामी झाल्याने शहर अंधारात गेले होते, तर दुरुस्तीनंतर अजूनही शहरात ठिकठिकाणी विजेचा लपंडाव सुरूच आहे. यामुळे नागरिक हवालदिल झाले आहेत. कल्याण पूर्वेतील चिकणीपाडा, छत्रपती शिवाजी महाराज कॉलनी, श्री मलंगगड रोड, चिंचपाडा, हनुमान नगर, कोळसेवाडी, तिसगाव, विजयनगर आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणावर विजेचा लपंडाव सुरू असल्याचे मागील काही दिवसांपासून पाहायला मिळत आहे, तर शहराच्या इतर काही भागातही हीच समस्या कायम आहे. वीजवाहिनी दुरुस्ती, तांत्रिक देखभाल, फीडर बदलणे अशा काही कारणामुळे महावितरण ठिकठिकाणी विजेसेवा खंडित करीत आहे. त्यामुळे हा खेळ आणखी किती दिवस चालणार, असा सवाल शहरातील नागरिकांसह व्यापारी व विद्यार्थी विचारत आहेत.

## शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्हावर ऑगस्टमध्ये निकाल?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्हाच्या याचिकेवर सध्या सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरु आहे. या प्रकरणी सुप्रीम कोर्टात आज देखील सुनावणी पार पडली. विशेष म्हणजे आता या प्रकरणाची सुनावणी आता थेट ऑगस्ट महिन्यात होणा आहे. त्यामुळे ऑगस्ट महिन्यात या प्रकरणावर निकाल येऊ शकतो, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. या प्रकरणात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने निकाल लागत नाही तोपर्यंत धनुष्यबाण चिन्ह गोठवण्याची मागणी सुप्रीम कोर्टात केली असल्याचीदेखील चर्चा आहे. अर्थात याबाबत काय काय घडामोडी घडतात ते आगामी काळात स्पष्ट होईलच. दरम्यान, सुप्रीम कोर्टाच्या संभाव्य निकालावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज प्रतिक्रिया दिली. ते विधान भवन परिसरात पत्रकारांशी बोलत होते.

"सुप्रीम कोर्ट ऑगस्टमध्ये निकाल देणार असतील तर नक्कीच समाधानकारक गोष्ट आहे. सर्वोच्च न्यायालय हे आमची एक शेवटची आशा आहे, जिथे या चोरी प्रकरणाचा न्याय निवाडा होईल. आमचं चिन्ह चोरलं गेलं आहे. निवडणूक आयोगाला चिन्ह देण्याचा अधिकार आहे. मात्र पक्षाचं नाव बदलण्याचा अधिकार नाही. तो निवडणूक आयोगाचा अधिकार नक्कीच नाही. कुणाचं नाव उचलून दुसऱ्याला द्यायचं हा निवडणूक आयोगाला अधिकार नाहीच. तो असूच शकत नाही. तो आम्ही मान्य करत नाही. एखाद्या पक्षाचं नाव उचलून ते दुसऱ्या कुणाला द्यायचं हे निवडणूक आयुक्ताचं कार्यक्षेत्र नाही. निवडणूक निशाणी ठीक आहे. पण नाव आम्ही त्यांचा अधिकार मानतच नाही", असं स्पष्ट मत उद्धव ठाकरे यांनी मांडलं.

## कल्याण-डोंबिवलीसाठी नवीन धरण !
### प्रस्ताव मंजुरीसाठी आ. राजेश मोरेंचे महत्त्वपूर्ण पाऊल



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची अडचण दूर करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश गोवर्धन मोरे यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विशेष निवेदन दिले. निवेदनामध्ये कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रासाठी स्वतंत्र धरणास मंजुरी देण्याची मागणी केली आहे. हे निवेदन मंत्री भरतशेठ गोगावले व आमदार शरद सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिले. नागरिकांची पाण्याची भविष्यातील समस्या सुटण्यासाठी हा निर्णय मोठा ठरेल अशी चर्चा शहर होत होती.





## मालवाहतूक टेम्पोमधून विद्यार्थ्यांची वाहतूक ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** अंबरनाथमधील एका खासगी इंग्रजी शाळेच्या भरधाव व्हॅनमधून दोन चिमुकली नर्सरीची मुले रस्त्यावर पडल्याच्या घटनेला अद्याप आठवडाही उलटला नाही. यामध्ये एक विद्यार्थी गंभीर जखमी झाला. तोच कल्याणमध्ये अशाच प्रकारचा धोकादायक प्रकार उघडकीस आला आहे.

कल्याण पूर्व येथील पत्रीपूल परिसरात होली फेथ इंग्लिश हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना चक्क एका मालवाहतूक करणाऱ्या टेम्पोमधून शाळेत ने-आण केली जात आहे. धक्कादायक म्हणजे या टेम्पोमध्ये विद्यार्थ्यांसाठी कोणतीही योग्य आसनव्यवस्था नाही आणि टेम्पोचा मागचा भाग उघडाच आहे.यातच मुलांच्या सुरक्षिततेसाठी एकही (सहाय्यक) त्यांच्यासोबत नाही. चिमुकले विद्यार्थी केवळ टेम्पोच्या लोखंडी पट्ट्यांचा आधार घेऊन उभे आहेत. दुर्दैवाने टेम्पो भरधाव वेगात असताना थोडा तरी अनियंत्रित झाला तर या निष्पाप मुलांच्या जीवावर बेतण्याची शक्यता आहे. ही मुले थेट रस्त्यावर फेकली जाऊन आक्रीत घडण्याची शक्यता आहे.

अंबरनाथच्या घटनेनंतर पालकांमध्ये संतापाचं वातावरण आहे. यानंतर कल्याण आरटीओने तेथील काही शाळांना नोटिसा बजावल्या आहेत. पण प्रत्यक्ष कारवाई, अनधिकृत बसेसची तपासणी, दोषींवर परवाने रद्द करण्याची कारवाई यापैकी काहीच झालेले दिसत नाही. धक्कादायक म्हणजे याच आरटीओ कार्यालयाच्या अवघ्या ५ किलोमीटर परिसरात एका टेम्पोमधून अशा प्रकारची जीवघेणा प्रकारची ने आण करताना दिसत आहे आणि तरीही आरटीओच्या अधिकारी निद्रावस्थेत आहेत. या यंत्रणेला पुन्हा एकदा आपली जबाबदारी झटकण्याचा सोपा मार्ग सापडलेला दिसत आहे

पालक संतप्त होऊन विचारत आहेत - अपघात झाल्यावरच तुम्हाला जाग येणार का? मुलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी नेमकी कुणाची आहे? त्यामुळे अशा घटनांना आता तरी आळा बसणार का ? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.












## रेंटल हाऊसिंगच्या ७२ थकबाकीदारांना ठाणे मनपाची नोटीस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या स्थावर मालमत्ता विभागाने रेंटल हाऊसिंगमधील भाडे थकवणाऱ्यांविरोधात आक्रमक पवित्रा घेतला असून, शहरातील ७२ रहिवाशांना थकबाकी भरण्याबाबत नोटीस बजावण्यात आली आहे. या नोटिसीनंतरही भाडे न भरल्यास संबंधित सदनिकांवर थेट जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका प्रशासनाने दिली आहे.

ठाणे महापालिकेने शहरातील विविध भागांत एकूण ११ ठिकाणी रेंटल हाऊसिंग इमारती उभारल्या असून त्यामध्ये सुमारे ३,५०० सदनिका आहेत. या घरांमध्ये मुख्यत्वे रस्ते रुंदीकरण, धोकादायक इमारतींचे पुनर्वसन, तसेच सार्वजनिक प्रकल्पांमुळे घरच्याबाहेर पडलेल्या नागरिकांना नाममात्र २ हजार रुपयांच्या भाड्याने घरे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. मात्र, काही लाभार्थ्यांनी हे भाडेदेखील महिनोन्महिने भरलेले नाही, ही बाब गंभीर स्वरूपात समोर आली आहे.

महापालिकेच्या स्थावर मालमत्ता विभागाकडून वारंवार सूचना दिल्यानंतरही अनेकांनी दुर्लक्ष केल्यामुळे आता याविरोधात थेट कारवाईचा बडगा उचलण्यात आला आहे.

या कारवाई अंतर्गत नौपाडा प्रभाग समिती हद्दीतील २२ आणि वर्तक नगर प्रभागातील ५० रहिवाशांना थकबाकी भरण्याबाबत नोटीस बजावण्यात आली आहे.

# गीतासार



### अध्याय १६
### दैवासुरसम्पद्विभागयोगः

आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया । यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः ॥ १६-१५ ॥ अनेकचित्तविभ्रान्ता मोहजालसमावृताः । प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचौ ॥ १६-१६ ॥

मी मोठा धनिक आणि मोठ्या कुळात जन्मलेला आहे. माझ्यासारखा दुसरा कोण आहे? मी यज्ञ करीन. दाने देईन. मजेत राहीन. अशा प्रकारे अज्ञानाने मोहित झालेले अनेक प्रकारांनी भ्रांतचित्त झालेले, मोहाच्या जाळ्यात अडकलेले आणि विषयभोगांत अत्यंत आसक्त असे आसुरी लोक महा अपवित्र नरकात पडतात. ॥ १६-१५, १६-१६ ॥

आत्मसम्भाविताः स्तब्धा धनमानमदान्विताः । यजन्ते नामयज्ञैस्ते दम्भेनाविधिपूर्वकम् ॥ १६-१७ ॥

ते स्वतःलाच श्रेष्ठ मानणारे घमेंडखोर लोक धन आणि मान यांच्या मदाने उन्मत्त होऊन केवळ नावाच्या यज्ञांनी पाखंडीपणाने शास्त्रविधिहीन यज्ञ करतात. ॥ १६-१७ ॥

अहङ्कारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः । मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयकाः ॥ १६-१८ ॥

ते अहंकार, बळ, घमेंड, कामना आणि क्रोधादिकांच्या आहारी गेलेले आणि दुसऱ्यांची निंदा करणारे पुरुष आपल्या व इतरांच्या शरीरांत असलेल्या मज अंतर्यामीचा द्वेष करणारे असतात. ॥ १६-१८ ॥

# महाराष्ट्राचा विवेकी आवाज : प्रा डॉ एन डी पाटील

फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा डॉ एन डी पाटील यांचा आज जयंती. प्रा डॉ एन डी पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले.



प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. (१९६२) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला.

शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते. आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. १७ जानेवारी २०२२ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

- श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे



## आरोग्य मंत्रालयाने मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत

# जंक फूड तंबाखूइतकेच धोकादायक !

भारतीय आरोग्य मंत्रालयाने देशातील लोकांमध्ये वाढत्या लठ्ठपणाच्या समस्येवर चिंता व्यक्त केली आहे. आरोग्य मंत्रालयाच्या मते, असा अंदाज आहे की २०२५ पर्यंत भारतातील एकूण ४४३९ कोटी लोक जास्त वजन आणि लठ्ठपणासारख्या आजारांनी ग्रस्त असतील. जर असे झाले तर भारत अमेरिकेनंतर दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक प्रभावित देश बनेल. आतापर्यंतच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास, प्रत्येक ५ शहरांमध्ये एक व्यक्ती जास्त वजनाचा बळी आहे.

आजच्या काळात मुलांमध्ये वाढती लठ्ठपणा, अन्नात फास्ट फूड आणि कमी होत चाललेल्या शारीरिक हालचालींमुळे चिंता आणखी वाढली आहे. आता लवकरच सरकारकडून बिस्किटे, जलेबी आणि समोशांमध्येही इशारे दिसू लागतील आणि इशारे दिले जातील.

### तेल आणि साखर बोर्ड लावण्याच्या सूचना

या समस्येवर मात करण्यासाठी, आरोग्य मंत्रालयाने देशभरातील सर्व केंद्रीय संस्थांना अन्नपदार्थांमध्ये 'तेल आणि साखर बोर्ड' लावण्याचे निर्देश दिले आहेत. यामध्ये नागपूरच्या एम्सचाही समावेश आहे. आरोग्य मंत्रालयाने संस्थांना चेतावणी फलक लावण्याचे निर्देश दिले आहेत, ज्यावर तुमच्या नाश्त्यात लपलेले चरबी आणि साखरेचे प्रमाण स्पष्टपणे लिहिलेले असेल. मंत्रालय या उपक्रमाकडे पाहत आहे कारण जंक फूड हा तंबाखूइतकाच गंभीर धोका आहे. हे बोर्ड सरकारी संस्थांसाठी इशारा म्हणून काम करेल. यामुळे लोकांमध्ये त्यांच्या संस्कृतीचा भाग मानल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांमध्ये चरबी आणि साखरेचे प्रमाण जास्त आहे याबद्दल जागरूकता येईल.

### जंक फूड तंबाखूइतकेच धोकादायक आहे

एम्स नागपूरच्या अधिकाऱ्यांनी मंत्रालयाच्या या सूचनांना दुजोरा दिला आहे. आता कॅफे आणि सार्वजनिक ठिकाणी असे चेतावणी फलक लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या अन्नपदार्थांमध्ये केवळ समोसा आणि जलेबीच नाही तर लाडू, वडा पाव आणि पकोडे देखील तपासणीच्या कक्षेत समाविष्ट केले जातील.

नागपूर हे या उपक्रमाचा अवलंब करणाऱ्या पहिल्या शहरांपैकी एक असेल. कोणत्याही अन्नपदार्थावर बंदी घालण्यात येणार नाही, परंतु प्रत्येक स्वादिष्ट नाश्त्याच्या शेजारी एक रंगीत साइनबोर्ड असेल ज्यावर लिहिले असेल: "सुज्ञपणे खा, तुमचे भविष्यातील शरीर तुमचे आभार मानेल."

# राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धेत रायगड जिल्हा प्रथम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : सोलापूर सिंहगड इंनस्टुट येथे 12 व्या राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धेचे आयोजन युनिफाईट वेलफेअर आसोशिएन महाराष्ट्र व सोलापूर युनिफाईट असोशिएशान ने दिनांक 12 व 13 जुलै 2025 रोजी केल्या होत्या ह्या स्पर्धेस महाराष्ट्रातुन जवळ जवळ 20 जिल्ह्यातील खेळाडुंनी सहभाग घेतला होता. ह्या स्पर्धेमध्ये रायगड जिल्ह्यानी 33 गोल्ड मेडल 11 सिलव्हर मेडल, 9 ब्रांझ मेडल पटकाऊन संपूर्ण राज्यात अव्वल स्थान राहुन प्रथम क्रमांकाची च्याम्पिंयन पटकावल.

ह्या स्पर्धेत खेळाडुना रविंद्र म्हात्रे ( पप्पू सर ), जिल्हा प्रतिनिधी युनिफाईट मुख्या प्रशिक्षक प्रशांत गांगर्डे तसेच निलेश भोसले, रोहीत भोसले आलोक निर्मल अनुज भोसले, सोहम सावंत, रोहीत थळी, दिपेश जाधव ह्या प्रशिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले. सर्व यशस्वी खेळाडूंचे युनायतेड शोतोकान कराटे असोशिएशन, रायगड युनिफाईट असोशिएशन, ह्यांच्या कडून अभिनंदन करण्यात आले तसेच पुढील होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्या बद्दल शुभेच्छा देण्यात आल्या. ह्या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र युनिफाईटचे अध्यक्ष संतोष खंदारे , सचिव मंदार पनवेलकर सोलापूर युनिफाईटचे अध्यक्ष इंगळे , सचिव बाळगे तसेच खजिनदार इकबाल शेख यांनी मेहनत घेतली.

# बौध्दिकदृष्ट्या विकलांग, अनाथ मुलांसाठी 'सितारे जमीन पर'

### स्पर्श फाउंडेशन संस्था, रेड स्वस्तिक सोसायटी व अनामिक फॉउंडेशनचा उपक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : स्पर्श फाउंडेशन संस्था, रेड स्वस्तिक सोसायटी व अनामिक फॉउंडेशन यांच्या वतीने समाजातील बौध्दिक दृष्ट्या विकलांग व अनाथ असलेल्या मुलांसाठी सितारे जमीन पर या चित्रपटाच्या विशेष शो चे आयोजन मूवी मॅक्स थिएटर, सर्वोदय मॉल कल्याण (पश्चिम) येथे आयोजित करण्यात आला होता. या मुलांसोबत त्यांच्या पालकांनी सुद्धा या चित्रपटाचा लाभ घेतला.




समाजातील मानसिक दृष्ट्या दिव्यांग असलेल्या मुलांमधील सुप्त कला गुणांना वाव देण्यासाठी, त्यांच्यातील क्रीडा विषयी असलेल्या आवडीला फुंकर घालून तसेच त्यांनाही इतरांप्रमाणे जगण्यातील आनंद मिळवून देण्याचा उद्देश ठेवून स्पर्श फाउंडेशन संस्थेचे प्रमुख डॉ. पुष्पराज स्वामी आणि रेड स्वस्तिक सोसायटी, भारतचे सह व्यस्थापकीय संचालक डॉ . प्रमोद नांदगावकर व अनामिका फॉउंडेशनचे विजय जोहरे यांनी स्पष्ट केले. या विशेष मुलांना हा शो दाखवल्या बद्दल मुलांमध्ये उत्साह व आत्मविश्वास निर्माण झाला व त्यांच्या निरागस चेहऱ्यावर बोलके भाव दिसून आले असे मनोगत मुलांच्या पालकांनी व्यक्त करून संस्थांचे मनापासून आभार व्यक्त केले.



हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुव्ही मॅक्स थिएटर कल्याणचे कर्मचारी, तसेच स्पर्श फाउंडेशनचे प्रमुख डॉ. पुष्पाराज स्वामी आणि रेड स्वस्तिक सोसायटी, भारतचे सह व्यस्थापकीय संचालक डॉ. प्रमोद नांदगावकर, कमलेश बोनावटे, लखन जगताप, अमर धनावडे, प्रशांत खजुरे, मुकुंद नावकर आणि इतर सहकाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

# थॅलेसेमिया रुग्णांसाठी रक्तदान शिबीर




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर परिसरातील थॅलेसेमिया रुग्णांसाठी रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण व खडकपाडा व्यापारी रहिवासी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरात नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत गरजू थॅलेसेमिया रुग्णांसाठी रक्तदान केले. थॅलेसेमिया हा एक गंभीर रक्तविकार असून, या आजाराने ग्रस्त रुग्णांना नियमितपणे रक्ताची आवश्यकता असते.

या गरजेला ओळखून रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करत असते. रविवारी झालेल्या शिबिरात सुमारे ५४ युनिट रक्तदान झाले त्याचप्रमाणे 1 जुलैला डॉक्टर दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण, सेंट्रल रेल्वे मजदूर संघ रोटरी क्लब ऑफ कल्याण डायमंड यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याण पश्चिम रेल्वे प्लॅटफॉर्म नं. १ येथेही शिबीर घेण्यात आले होते त्यामुळे १५ दिवसांत सुमारे १२५ युनिट रक्त जमा झाले.

रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणचे प्रकल्प प्रमुख गौतम दिवाडकर, प्रफुल्ल क्षीरसागर, उपप्रमुख अनिल अग्रवाल, तेजस्विनी पाठक यांनी दोन्ही शिबिरांचे चोख नियोजन केले होते. त्याचबरोबर ही दोन्ही शिबिरे यशस्वी करण्यासाठी खडकपाडा व्यापारी रहिवासी संघटना, इनरव्हील क्लब ऑफ कल्याण, रोटरी क्लब ऑफ कल्याण डायमंड्स, रोटरॅक्ट क्लब ऑफ अचीवर्स कॉलेज, रोटरॅक्ट क्लब ऑफ न्यू कल्याण यांची मोलाची साथ मिळाली. रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणचे नवनिर्वाचित अध्यक्ष धिरेन्द्र सिंह तसेच खडकपाडा व्यापारी रहिवासी संघटनेचे प्रमुख उमेश बोरगावकर यांनी सर्व रक्तदात्यांचे आभार मानले आणि भविष्यातही अशा उपक्रमांत सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले.

## रेसिपी

# उपवासाचा डोसा



साहित्य: एक कप वरी तांदूळाचा भात, १/४ कप भाजलेला साबुदाणा, आले, हिरवी मिरची, अर्धा उकडलेला बटाटा ,१ टेबलस्पून जिरे ,चिरलेली कढीपत्ता, कोथिंबीर पाने

३-४ कप पाणी, चवीनुसार मीठ ,भाजलेले शेंगदाणे ,आले-हिरवी मिरची ,चवीनुसार मीठ

दही, कोथिंबीर पाने ,पाणी आणि तेल ,जिरे आणि कढीपत्ता

कृती : सर्वप्रथम, साबुदाणा भाजल्यानंतर, तो मिक्सर जारमध्ये ठेवा, त्यात सम तांदूळ मिसळा. दोन्ही बारीक केल्यानंतर, आले, हिरवी मिरची, उकडलेले बटाटे आणि एक कप पाणी घाला. आता हे सर्व पुन्हा बारीक करा. अशा प्रकारे तुमच्या डोस्यासाठीचे पीठ तयार होईल. ते एका भांड्यात काढा आणि त्यात मीठ, जिरे, चिरलेली कढीपत्ता आणि कोथिंबीर घाला. पीठ तयार केल्यानंतर, आता डोसा बनवण्याची वेळ आली आहे. म्हणून, रेणुका साळुंके यांच्या युक्तीनुसार, डोसा बनवण्यासाठी तव्याऐवजी वोक वापरा. वोक गरम झाल्यावर, पीठ पसरवा, सर्व बाजूंनी तेल लावा आणि नंतर ते उलटा करा. दोन्ही बाजूंनी शिजल्यानंतर तुमचा व्रतवाला डोसा तयार होईल.

### अशी तयार करा चटणी

चटणी बनवण्यासाठी, भाजलेल्या शेंगदाण्यांची साल काढून टाकल्यानंतर, ते मिक्सर जारमध्ये ठेवा. त्यात आले, हिरवी मिरची, धणे, मीठ, दही आणि पाणी घालून बारीक करा. ही चटणी एका भांड्यात काढून टाकल्यानंतर, टेम्परिंग तयार करा. तेल गरम केल्यानंतर, जिरे आणि कढीपत्ता घाला आणि चटणीमध्ये टेम्परिंग मिसळा. अशा प्रकारे, तुमच्या उपवासाच्या डोसाची चटणी देखील तयार होईल.

# मालमत्ता विरुपण प्रतिबंध अधिनियमातंर्गत केडीएमसी हद्दीत ५ गुन्हे दाखल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार शहर विद्रुपीकरणात भर घालणा-या होर्डिंग्ज व बॅनर्सवर निष्कासनाची कारवाई नियमित स्वरुपात करण्यात येत आहे. याच अनुषंगाने ६/फ प्रभागाच्या सहा. आयुक्त हेमा मुंबरकर यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक्षक जयवंत चौधरी यांनी डोंबिवली पूर्वेतील पाथर्ली,गोपालनगर व टिळकनगर परिसरातील अनाधिकृत होर्डिंग्ज/बॅनर्सवर महाराष्ट्र मालमत्ता विरुपणास प्रतिबंध अधिनियमातंर्गत ५




गुन्हे दाखल केले आहेत. यामध्ये 1) ॲक्टीव्ह योगा 2) SARTHISERENITY 3) TINY STAR PER SCHOOL 4) HOTEL SWAGAT 5) K.R.KOTKAR JR COLLEGE या नावाने जाहिरातींचे बॅनर्स लावतांना महापालिकेची कुठलीही परवानगी घेतलीबाबतची नोंद दिसून येत नसल्यामुळे टिळक नगर पोलीस स्टेशन ,डोंबिवली येथे महाराष्ट्र मालमत्ता विरुपणास प्रतिबंध अधिनियम १९९५ चे कलम ३ अन्वये FIR दाखल करण्यात आला आहे.

# घोटसई येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनस्थ शिल्पफलकाचे अनावरण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या साक्षीदार महाराष्ट्रातील १२ गडकिल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा मान बहाल केला आहे. ही महाराष्ट्रासाठी आणि संपूर्ण भारतासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. याच अनुषंगाने आमदार किसन कथोरे यांच्या मार्गदर्शनाखाली व सरपंच राजेंद्र मगर यांच्या संकल्पनेने कल्याण तालुक्यातील घोटसई गावात छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनस्थ भव्य शिल्पफलकाचे अनावरण उत्साहात करण्यात आले.



भाजपा जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी यांच्या प्रमुख उपस्थित या शिल्पाचे अनावरण करण्यात आले. यावेळी भाजपा अध्यक्ष कल्याण ग्रामीण शेखर लोणे, कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती रविंद्र घोडविंदे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष राजाराम चौधरी, उद्योजक दिनेश कथोरे, कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक योगेश धुमाळ, आधार दिव्यांग संस्थेचे अध्यक्ष भगवान शिरोसे, समाजसेवक काशिनाथ मगर, शंभुदुर्ग संघटना संस्थापक अध्यक्ष आदेश चौधरी, ग्रामपंचायत म्हसकल अनखर पाडा उपसरपंच अनंत दोरलेकर, फळेगाव ग्रामपंचायत सदस्य प्रविण ढोले, समाजसेवक गणेश जाधव, रविंद्र जाधव, मुकेश शेलार, पांडुरंग टेंभे, सुनील डवले, नरेश टेंभे, अमोल गुजरे, डॉ. नांदगावकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिल्पाचे मूर्तिकार पप्पी गोडांबे आहेत. यावेळी ग्रामपंचायत घोटसई उपसरपंच रोशनी धुमाळ, सदस्य संतोष धुमाळ, सुयोग मगर, वनिता मगर, जागृती गायकवाड,. दया मगर हे देखील उपस्थित होते. या शिल्पाचे सर्वच स्तरातून कौतुक होत असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या या शिल्पामुळे गावातील सर्वांनाच एक स्फूर्ती मिळणार असल्याचे राजेंद्र मगर यांनी सांगितले.



## आजचे राशि भविष्य

### मेष
अभ्यास आणि अध्यापनाशी संबंधित लोकांसाठी आजचा दिवस चांगला आहे. तुम्हाला लवकरच मोठे यश मिळणार आहे. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

### वृषभ
व्यावसायिकांसाठी दिवस चांगला आहे.या काळात तुम्ही तुमचे आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न कराल. नोकरीत पदोन्नती तसेच उत्पन्नात वाढ होईल.

### मिथुन
तुमचे कौटुंबिक जीवन खूप आनंददायी असणार आहे. तुमचे ध्येय साध्य करण्यासाठी तुम्ही तयार असाल. तुमच्या वैवाहिक जीवनात सुंदर समन्वय राहील.

### कर्क
आजचा दिवस आनंदात व्यतीत कराल. तुम्हाला तुमच्या मुलाकडून एखादी चांगली बातमी मिळेल. तुमचे मन प्रसन्न राहील. शैक्षणिक कार्यात यश मिळेल.

### सिंह
तुमचा मान-सन्मान वाढेल. अधिकाऱ्यांशी सुसंवाद राखाल. प्रगतीच्या संधी मिळतील.कठोर परिश्रम आणि सकारात्मक वर्तनाने कठीण परिस्थितीतून बाहेर पडाल.

### कन्या
पैशाच्या व्यवहारात थोडे सावध राहा. तुमचे जीवन चांगले राहील.तुम्ही काही खेळांमध्ये भाग घेऊ शकता. व्यवसाय वाढवण्याची सुवर्णसंधी मिळेल.

### तूळ
व्यवसायाशी संबंधित प्रवास करावा लागेल. आज तुम्हाला काही अनुभवी लोक भेटतील. ज्यामुळे तुम्हाला भविष्यात फायदा होईल.


### वृश्चिक
व्यवसायात चांगला नफा मिळेल.कार्यालयात सहकाऱ्यांशी चांगला समन्वय राहील. वरिष्ठ तुमच्या कामावर खूश होतील. तुम्हाला बढती मिळेल.

### धनु
तुमचा पगारही वाढू शकतो. कामाच्या ठिकाणी शहाणपणाने घेतलेले निर्णय तुम्हाला चांगले परिणाम देतील. जुन्या जमिनीच्या मालमत्तेतून नफा मिळेल.

### मकर
सरकारी क्षेत्रात चांगली नोकरी मिळेल. तुमचे कुटुंब खूप आनंदी व्हाल.अनावश्यक खर्च टाळावा.कामाच्या ठिकाणी काही नवीन कल्पना आणाल.

### कुंभ
तुमच्या सकारात्मक वृत्तीमुळेच तुम्हाला नोकरीत बढती मिळेल.अपेक्षेपेक्षा जास्त लाभ होण्याची शक्यता आहे.तुम्ही बांधकाम व्यवसायात गुंतलेले असाल.

### मीन
तुमच्यासाठी फायद्याची शक्यता आहे आणि तुम्ही तुमच्या कामात काही बदल करण्याचा निर्णय घेऊ शकता. तुमच्या जोडीदाराला भेटवस्तू द्याल.






# रायगड आरोग्य विभागाचा असंवेदनशील कारभार

## दिशा समितीच्या बैठकीत खासदारांकडून ताशेरे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अलिबाग, ता. १४ (वार्ताहर)

काही महिन्यांपासून जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा सामान्य रुग्णालयाबाबत तक्रारी येत आहेत. अनेक केंद्रांचे निवासी वैद्यकीय अधिकारी नियुक्तीच्या ठिकाणी राहात नसल्याने रात्रीच्या वेळी रुग्णांची परवड होते. याबाबत तातडीने अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले दिल्या आहेत. जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारतींची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. याबाबत त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले. जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची (दिशा) बैठक खासदार श्रीरंग बारणे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (ता. १४) झाली. बैठकीत खासदार सुनील तटकरे यांनी आरोग्य विभागाच्या भोंगळ कारभारावर ताशेरे ओढले. त्याचप्रमाणे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. या वेळी खासदार धैर्यशील पाटील, आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलिस अधीक्षक आचल दलाल, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन रवींद्र शेळके, पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

दिव्यांगांसाठी असणाऱ्या विविध योजनांचा लाभ देण्यासाठी जिल्हाभरात शिबिरे घेण्याच्या सूचना मध्यंतरी करण्यात आल्या होत्या, मात्र या सूचनांचे पालन आरोग्य विभाग तसेच जिल्हा शल्यचिकित्सकांकडून झाले नाही. त्यामुळे आजही अनेकांना सामान्य रुग्णालय अथवा शासकीय कार्यालयांत फेऱ्या माराव्या लागतात. आरोग्य विभागाचा दिव्यांगांप्रति असलेल्या असंवेदनशील कारभारावर या वेळी नाराजी व्यक्त करण्यात आली.

### 'त्या' ठेकेदाराला काळ्या यादीत टाका!

**जिल्ह्यात प्रमुख महामार्गासह अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील कामे अनेक वर्षांपासून रखडली आहेत. याबाबत समिती सदस्यांनी नाराजी व्यक्त करून जे ठेकेदार रस्त्याची कामे करीत नाहीत त्यांना काळ्या यादीत टाकावे आणि नव्याने निविदा प्रक्रिया राबवावी. तसेच ज्या रस्त्यांच्या कामांसाठी नव्याने ठेकेदार नियुक्त केला आहे, त्यांना तातडीने कामे सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या.**

# वसई-विरार पालिकेच्या पाणीपट्टीवाढीला ५३ गावांचा विरोध




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

विरार, ता. १४ (बातमीदार) :

वसई-विरार महापालिकेमध्ये ५३ गावांचा समावेश करताना ग्रामपंचायतकालीन असलेली ३६० रुपये वार्षिक पाणीपट्टी 'जैसे थे' ठेवण्यात आली होती, परंतु त्यामध्ये अचानकपणे पाचपट वाढ करून वार्षिक ३६० रुपये असलेली पाणीपट्टी थेट १,८०० रुपये केली आहे. त्यामुळे नागरिकांनी या मनमानी पाणीपट्टीवाढीला विरोध करत ती रद्द करण्याची मागणी माजी सभापती कन्हैया भोईर यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

महापालिका स्थापनेवेळी नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या ५३ ग्रामपंचायती व इतर ग्रामीण भागाकरिता कोणत्याही प्रकारची करवाढ न करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. तसेच ग्रामपंचायतकालीन पाणीपट्टी 'जैसे थे' ठेवण्यात आली होती, परंतु अचानक पाणीपट्टीमध्ये पाचपट वाढ केल्याने नागरिकांकडून त्याला कडाडून विरोध होत आहे. ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर शेतकरी, कष्टकरी रोजंदारी व नोकरीवर उदरनिर्वाह करणारी सर्वसामान्य जनता राहते. वाढत्या लोकसंख्येनुसार उत्पन्नवाढीचे स्रोत म्हणून शहरी भागाप्रमाणे समान करवाढ धोरण राबवत पाणीपट्टीवाढीचा बोजा ग्रामीण भागातील जनतेवर लादल्याने मोठा जनआक्रोश उफाळलेला आहे.

प्रशासकीय राजवटीमध्ये रस्ते, पाणी, गटार, आरोग्य या मूलभूत सुविधांचा बोजवारा उडालेला आहे. माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांनी त्यांच्या कार्यकाळात ग्रामीण भागातील जनतेवर करवाढ होऊ दिली नाही. त्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी सर्वसामान्य गोरगरीब जनतेला करवाढीच्या माध्यमातून वेठीस धरणे पूर्णतः चुकीचे असल्याचे मत भोईर यांनी व्यक्त केले आहे.

# नवी मुंबई मनपाचे 'सफाई अपनाओ बिमारी भगाओ' अभियान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पावसाळ्याच्या तोंडावर नवी मुंबईत डेंग्यू आणि हिवतापासारख्या साथीच्या रोगांचा धोका वाढत चालला असून, डेंग्यूचे संशयित रुग्ण वाढत असल्याचे महापालिकेच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. त्यामुळेच 'सफाई अपनाओ बिमारी भगाओ' या अभियानाअंतर्गत नवी मुंबई महापालिकेकडून विविध प्रतिबंधात्मक आणि जनजागृती उपक्रम राबवले जात आहेत. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली १ जुलैपासून 'सफाई अपनाओ -बिमारी भगाओ' या मोहिमेअंतर्गत २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कार्यक्षेत्रात मलेरिया व डेंग्यू प्रतिबंधक शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. २ आणि ३ जुलै रोजी घेण्यात आलेल्या ५२ शिबिरांमध्ये एकूण २२,६९० नागरिकांनी भेट दिली असून त्यामधून १,३१० रक्तनमुने तपासणीसाठी घेण्यात आले.

# मुंबई अहमदाबाद महामार्गावर चार वाहनांच्या धडकेने वाहतुकीचा खोळंबा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसईः मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील मालजीपाडा येथे एकापाठोपाठ एक चार वाहनांची धडक लागून अपघात घडला आहे. ही घटना सोमवारी दुपारी २.३० सुमारास घडली. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नसून जवळपास दोन तास वाहतूक विस्कळीत झाली होती. वसई पूर्वेच्या भागातून मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे याच महामार्गावर सोमवारी मुंबई वाहिनीवरून वाहनांची वर्दळ सुरू असताना मालजीपाडा जवळ एका आयशर टेम्पोने ब्रेक मारला. त्यामुळे त्याच्या पाठीमागून येणारी एक चारचाकी व दोन कंटेनर अशी चार वाहनांची धडक झाली. या धडकेत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसून यात चारही वाहनांचे नुकसान झाले असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# ठाणे पूर्वेतील सॅटीसपुलाच्या जोडणीसाठी मेगाब्लॉकची प्रतीक्षा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे पुर्व स्थानक परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'स्थानक परिसर वाहतूक सुधारणा प्रकल्प' (सॅटीस) प्रकल्पामध्ये रेल्वे मार्गिकच्या दोन्ही बाजूला उड्डाण पुलांची उभारणी झाली असून ही मार्गिका जोडणीचे काम करण्यासाठी पालिकेने रेल्वे विभागाच्या आवश्यक परवानग्या नुकत्याच मिळविल्या आहेत. यानंतर मार्गिका जोडणीच्या कामासाठी रेल्वेचे दोन तासांचे १४ मेगाब्लॉक घ्यावे लागणार आहे. यासंदर्भात पालिका प्रशासन आणि रेल्वे अधिकारी यांच्यात नुकतीच एक महत्त्वाची बैठक पार पडली असून, लवकरच मेगाब्लॉकच्या तारखा निश्चित होतील, अशी माहिती महापालिकेकडून देण्यात आली आहे.

या भागात होणारी वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी स्थानकाच्या पश्चिमेला सॅटिस पुलाची उभारणी करण्यात आली. या पुलाच्या उभारणीनंतर येथील कोंडी काही प्रमाणात कमी झाल्याचे चित्र आहे. ठाणे पुर्व स्थानक परिसरातूनही अनेक नागरिक मोठ्या संख्येने प्रवास करतात. नवी मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या ट्रान्स हार्बरचा फलाट हा पुर्व बाजूस आहे. त्यामुळे बहुतेक प्रवासी पुर्व भागातूनच प्रवास करतात. तसेच लांब पल्ल्यांच्या गाड्यांचा फलाट जवळ असल्यामुळे हे प्रवासी सुद्धा स्थानकाच्या पुर्व भागातून वाहतूक करतात. ठाण्यासह विविध परिवहन उपक्रमांच्या बोरिवली भागात जाणाऱ्या बसगाड्या येथून सुटतात. याशिवाय, खासगी बसगाड्याही येथूनच वाहतूक करतात. यामुळे या स्थानक परिसरातही वाहतूक कोंडी होऊ लागली आहे. ही समस्या सोडविण्यासाठी पश्चिमेच्या धर्तीवर 'स्मार्ट सिटी योजनेतून सुमारे २६० कोटी रुपये खर्चुन स्थानकाच्या पूर्वेला सॅटीस प्रकल्पाची उभारणी करण्यात येत आहे.



ठाणे पुर्व स्थानक परिसरातील सॅटीस प्रकल्पातील रेल्वे रुळांवरील पूलजोडणीचे काम शिल्लक होते. रेल्वेच्या ओव्हर हेड वायरच्या खांबाची उंची कमी करण्याच्या कामासाठी पालिकेने रेल्वे विभागाकडे काही महिन्यांपुर्वी १ कोटी ९० लाख रुपये जमा केले होते. हे काम रेल्वे विभागाने नुकतेच पुर्ण केले आहे. पुढच्या टप्प्यात ४७ मीटरच्या पुल जोडणीच्या कामासाठी आवश्यक परवानग्या घेण्याचे काम पालिकेने सुरू केले होते. हे काम नुकतेच पुर्ण झाल्यानंतर पालिकेने रेल्वे विभागाला पत्र पाठवून मार्गिका जोडणी कामासाठी रेल्वेचे दोन तासांचे १४ मेगाब्लॉक देण्याची मागणी केली आहे. या संदर्भात रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत नुकतीच एक बैठक झाली असून लवकरच त्यांच्याकडून परवानगी मिळेल, असे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**या प्रकल्पात तुळजा भवानी मंदिर, पूर्व द्रुतगती महामार्गावरील सेवा रस्ता ते कोपरी कन्हैया नगर, एमजेपी कार्यालयापर्यंत असा एकूण २.२४ किमी लांबीचा उन्नत मार्ग असेल. यात १२ मीटर रुंद मार्गिका असतील. स्थानकात वाहतूक व्यवस्थापनासाठी ९ हजार चौरस मीटर डेक उभारणी. डेक उन्नत मार्गाला जोडण्यात येणार असून त्यात 'स्टेशन बिल्डिंग'चाही समावेश असेल.**

# उल्हासनगरात भव्य वस्त्रोद्योग मेळावा




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : उल्हासनगर येथील रिजेन्सी अ‍ॅन्टेलियाच्या प्रांगणात रविवार पासुन तीन दिवस उल्हासनगर गारमेंट फेअरचे भव्य प्रमाणात आयोजन करण्यात आले आहे. सदर मेळाव्याचे उद्घाटन संजय सावकारे वस्त्रोद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आले. या मेळाव्यात उल्हासनगर मधील जवळजवळ १६६ नामांकित कपडा व्यवसायातील ब्रॅण्डनी आपले दालन लावले आहे. लहान मुलांपासून ते स्त्रियांचे आकर्षक कपडे येथे पहावयास मिळत आहेत. ठोक व्यापारी, किरकोळ व्यापारी तसेच दलालांसाठी एकाच छत्राखाली विविध ब्रॅण्डचे कपडे पहाणे सुलभ झाले आहे. रविवार व सोमवार रोजी येथे इच्छुकांनी अलोट गर्दी केली. दालनांना भेट देण्यासाठी अलोट असा प्रतिसाद लाभला आहे. तेव्हा मंगळवार हा मेळाव्याचा शेवटचा दिवस असून आणखी व्यापारी येथे भेट देतील असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.




# ठाणे मनपा वर्षा मॅरेथॉन कार्यालयाचे आयुक्तांच्या हस्ते उद्‌घाटन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महानगर पालिकेच्या वतीने दिनांक 10 ऑगस्ट 2025 रोजी होणा-या ठाणे महानगरपालिका वर्षा मॅरेथॉन स्पर्धेच्या कार्यालयाचे उद्घाटन आज (14.07.2025) महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते झाले. 'मॅरेथॉन ठाण्याची... उर्जा तरुणाईची' असे यंदाच्या मॅरेथॉन स्पर्धेचे सूत्र आहे. स्पर्धकांना नोंदणी करता यावी तसेच स्पर्धेबाबत मार्गदर्शन मिळावे यासाठी ठाणे महानगरपालिकेतील पहिल्या मजल्यावरील धर्मवीर आनंद दिघे सभागृहात मॅरेथॉन कार्यालय सुरू करण्यात आले आहे. यावेळी अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, नगरअभियंता प्रशांत सोनग्रा, उपायुक्त मनिष जोशी, मीनल पालांडे, ठाणे जिल्हा अ‍ॅथलेटिक्स असोसिएशनचे पदाधिकारी, ठाणेकर ज्येष्ठ नागरिक, शाळेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कोविड 19 च्या पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिका वर्षा मॅरेथॉन घेण्यात आली नव्हती. तद्नंतर सहा वर्षानंतर ही मॅरेथॉन होत असल्याने ठाणेकरांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या स्पर्धेत मुंबई ठाण्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातून अनेक स्पर्धक सहभागी होत असतात. त्याचप्रमाणे आर्मीमधील नामवंत खेळाडू सहभागी होत असतात. स्पर्धेत सहभागी होणा-या स्पर्धकांना मॅरेथॉन स्पर्धेची संपूर्ण माहिती मिळावी तसेच स्पर्धेचे प्रवेश अर्ज, चेस्ट नंबर आदी अनुषंगिक कामांची पूर्तता मॅरेथॉनचे कार्यालयात करण्यात येणार असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले. यावेळी ठाणे महानगरपालिका वर्षा मॅरेथॉनच्या बोधचिन्हाचे अनावरण आयुक्तांच्या हस्ते करण्यात आले.

ठाणे महानगरपालिका वर्षा मॅरेथॉन स्पर्धेत जिल्हयातील शालेय विद्यार्थी मोठया संख्येने सहभागी होणार असून स्पर्धकांची नोंद करता यावी तसेच स्पर्धकांना माहीती मिळावी व संपर्क साधता यावा यासाठी सदर कार्यालय सुरू करण्यात आले आहे, तसेच स्पर्धेबाबतच्या बैठकाही या कार्यालयात होणार आहेत. शालेय विद्यार्थ्यापासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यत विविध 12 गटात ही स्पर्धा होणार आहे. नागरिकांमध्ये आरोग्यविषयक तसेच क्रिडाविषयक जागरुकता वाढली पाहिजे हा या मागचा हेतू असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले. यावेळी आयुक्तांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी यांना स्पर्धेचे अर्ज वाटप करण्यात आले.

या स्पर्धेत 30 हजाराहून नागरिक, ठाणे शहरातील शाळांमधील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, सेलिब्रेटी, लोकप्रतिनिधी सहभागी होणार असून ठाणेकरांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे. यावेळी ठाणे जिल्हा अ‍ॅथलेटिक्स असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रमोद कुलकर्णी, कृष्णकुमार कोळी, सचिव अशोक आहेर, खजिनदार भूपेंद्र ठाणेकर, सदस्य एकनाथ पवळे, सचिन मराठे, सुशांत पाटील आदी उपस्थित होते.

# गुणवत्ता यादीत झळकला उल्हासनगर मनपा शाळेतील विद्यार्थी



**आयुक्त श्रीम. मनिषा आव्हाळे (भा.प्र.से.) यांनी सदर विद्यार्थ्याचे कौतूक करून, शाळेतील सर्व शिक्षकांचे केले अभिनंदन**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळांमधील एकूण १११ विद्यार्थी उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेला पात्र ठरले होते. त्यापैकी एकूण १३ विद्यार्थी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाले तर उल्हासनगर महापालिका शाळा क्रमांक २८ चा एक विद्यार्थी "इर्शाद मोहम्मदजैद मोहम्मद" हा गुणवत्ता यादीमध्ये झळकला असल्याने उल्हासनगर महापालिका शिक्षण विभागाचे नांव उज्वल झाले आहे. यावावत मा. प्रशासक तथा आयुक्त श्रीम. मनिषा आव्हाळे (भा.प्र.से.) यांनी सदर विद्यार्थ्याचे कौतूक करून, शाळेतील सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले व "इर्शाद मोहम्मदजैद मोहम्मद" याला भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच सदर विद्यार्थ्याच्या यशामुळे शाळेतील इतर विद्यार्थ्यांना देखील प्रेरणा मिळून यापुढे अधिकाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत येण्याचा नक्कीच प्रयत्न करतील, अशी आशा महापालिका आयुक्तांनी व्यक्त केली.

# खुशबू ठाकरे मृत्यूप्रकरणी तहसील कार्यालयासमोर १६ जुलैपासून ठिय्या आंदोलन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण तालुक्यातील वरवणे येथील आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थिनी खुशबू ठाकरे हिच्या मृत्यूप्रकरणी अद्याप दोषींवर गुन्हा दाखल करण्यात आलेला नसल्याने तीव्र संताप व्यक्त होत असून, १६ जुलैपासून पेण तहसील कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

खुशबू ठाकरे ही आदिवासी विद्यार्थिनी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळेत शिक्षण घेत होती. तिच्यावर कुष्ठरोगावर उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला. या घटनेला तब्बल सहा महिने उलटूनही संबंधित दोषींवर कोणतीही कायदेशीर कारवाई झालेली नाही, यामुळे तिच्या कुटुंबासोबतच सामाजिक क्षेत्रात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणात आरोग्य विभागाचा चौकशी अहवाल व केमिकल अ‍ॅनालिसिसचा रिपोर्ट अद्यापही आलेला नाही तसेच अहवालांची वाट न पाहता सरळ दोषींवर गुन्हा दाखल करावा, अशा प्रमुख मागणीसह ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली १६ जुलैपासून तहसील कार्यालय पेण येथे बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येणार आहे. या आआंदोलनाबाबतच निवेदन तहसीलदार तानाजी शेजाळ आणि तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक नवरखेड यांना देण्यात आले आहे. संतोष ठाकूर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी यावेळी आवाहन केले की, खुशबूच्या मृत्यूस जबाबदार व्यक्तींवर गुन्हा नोंदवून आदिवासी कन्येला न्याय मिळवून देण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी विशेषतः आदिवासी समाज, सामाजिक संस्था, राजकीय पक्ष एकत्र येऊन या लढ्याला साथ द्यावी.

# वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना दप्तर वाटप

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे उपायुक्त शैलेश दोंदे यांनी दप्तरे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपत आपला वाढदिवस केला साजरा**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : ज्या समाजात जन्माला आलो त्या समाजाचं आपण काहीतरी देणं लागतो या कर्तव्य भावनेतून सामाजिक बांधिलकी जपत एका महानगरपालिकेच्या अधीकाऱ्याने विद्यार्थ्यांना दप्तरे वाटप करून आपला वाढदिवस केल्याने सर्वच स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

आपल्या हातुन नेहमीचं सामाजिक कार्य घडत रहावे या उदात्त भावनेने भिवंडी तालुक्यातील अतिशय मागासलेल्या व दुर्गम भागातील पाच्छापूर जवळील "जांभुळपाडा" या आदिवासी पाड्यातील विद्यार्थांना भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे उपायुक्त शैलेश दोंदे यांनी दप्तरे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपत आपला वाढदिवस साजरा केला.



विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन, आपलं भवितव्य घडवलं पाहिजे तसेच ग्रामीण भागात शैक्षणिक चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या परीने आपली शैक्षणिक जबाबदारी पार पाडली पाहिजे आजचे विद्यार्थी हे या देशाचे उद्याचे भवितव्य आहेत.असे सांगुन विद्यार्थ्यांना भिवंडी महापालिकेचे उपायुक्त दोंदे यांनी मार्गदर्शन केले. तर यावेळी या ठिकाणी उपस्थित असलेले कवी मिलिंद जाधव यांनी विद्यार्थ्यांसमोर कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली यावेळी पाच्छापुर ग्रामपंचायतीचे सरपंच हेमंत जाधव, सामाजिक कार्यकर्ते विशाल सोष्टे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# बनावट खतांविरोधात राज्यांनी कठोर पावले उचलावीत - शिवराज सिंह चौहान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : देशभरात बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खतांच्या विक्रीबाबत वाढती चिंता व्यक्त करत केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण तसेच ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत. शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी आणि त्यांना गुणवत्तापूर्ण खते वेळेवर व योग्य दरात उपलब्ध करून देण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे.श्री. चौहान यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, कृषी ही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर ठेवण्यासाठी दर्जेदार खतांची वेळेवर उपलब्धता अत्यावश्यक आहे. त्यांनी बनावट खतांची विक्री, सबसिडीवरील खतांचा काळाबाजार आणि जबरदस्तीने टॅगिंग करण्यासारख्या बेकायदा प्रकारांवर कठोर कारवाई करण्याची गरज अधोरेखित केली आहे.पत्रात पुढे म्हटले आहे की, खतांची उपलब्धता सुनिश्चित करणे ही राज्यांची जबाबदारी असून, काळाबाजार, जादा किमतीत विक्री आणि सबसिडीवरील खतांचे चुकीच्या पद्धतीने वितरण यावर कडक नजर ठेवावी. खतांच्या उत्पादन आणि विक्रीवर नियमित देखरेख ठेवून सॅम्पलिंग आणि चाचणी प्रक्रियेद्वारे निकृष्ट दर्जाच्या खतांवर नियंत्रण ठेवावे. पारंपरिक खतांसह नॅनो-खते किंवा जैव-उत्तेजकांचे जबरदस्तीने टॅगिंग थांबवून दोषींविरुद्ध परवाना रद्द करणे, गुन्हे नोंदवणे आणि कायदेशीर कारवाई करावी.

शेतकऱ्यांना या प्रकारांपासून वाचवण्यासाठी त्यांना जागरूक करणे आणि त्यांच्याकडून फीडबॅक घेण्यासाठी प्रभावी यंत्रणा तयार करण्याचे निर्देशही पत्रात देण्यात आले आहेत. शेतकरी व शेतकरी गटांना देखरेख प्रक्रियेत सहभागी करून खऱ्या-खोट्या उत्पादनांची ओळख पटवण्याची यंत्रणा विकसित करावी, असेही चौहान यांनी म्हटले आहे.केंद्रीय मंत्र्यांनी राज्य सरकारांना आवाहन केले आहे की, वरील मार्गदर्शक तत्वांच्या आधारे राज्यव्यापी मोहीम राबवून बनावट आणि निकृष्ट खतांचा संपूर्ण बंदोबस्त करावा. राज्य पातळीवर या प्रक्रियेवर नियमित देखरेख ठेवली गेल्यास हा शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रभावी आणि शाश्वत उपाय ठरू शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

## गुरे चोरणाऱ्या टोळीला पेण पोलिसांनी घेतले ताब्यात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण तालुक्यातील वाकरुळ गावाच्या हद्दीतील स्मशान भूमीजवळील गुरे घेऊन जात असणाऱ्या टोळीला पेण पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. - त्यांच्याकडून चार लहान जातीचे - वासरू आणि तीन गायी आणि टाटा - टेम्पो असा एकूण जवळपास ३ लाख ६० हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला. यातील चार आरोपींवर पेण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी शोयब अजीजजुल रहेमान सय्यद (वय ४०), व मुनाफ मुनीर शेख (वय ३२ रा. गोवंडी) तसेच लक्षण मरगळा आणि संतोष विठ्ठल येरणकर (रा. मांगरुळ) या आरोपींवर पेण पोलिस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शहापूर : पालीगाव हद्दीत सापडला अनोळखी इसमाचा मृतदेह



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : मुंबई नाशिक महामार्गालत मौजी पाली गांव हद्दीत एका बंद पडलेल्या पेट्रोल पंपाच्या बंद खोली मागे एका अनोळखी वयस्कर इसमाचा मृतदेह सापडला असून याबाबत वासिंद पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार 8 जुलै रोजी मुंबई- नाशिक महामार्गालत मौजे पाली गांव हद्दीत असलेल्या एका बंद पडलेल्या पेट्रोल पंपाच्या बंद खोली मागे एका वय अंदाजे 60 ते 65 वयस्कर अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे. याबाबत साईनाथ तरणे यांनी खबर दिल्यानंतर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून सदर, व्यक्तीच्या वारसांचा शोध होणेकामी तपास सुरू आहे.

सदर व्यक्ती अंगाने सडपातळ, केस काळे, दाढी पांढरी, चेहरा लांबट, अंगात नेसूस हाफ बाह्यांचा शर्ट त्याची कॉलर हिरवी, कमरेस काळा करगोटा, जांभळया कलरची फुल पँट अशा वर्णनाचा अनोळखी मयत इसम मिळून आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक एल.डी.वातास यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून याबाबत वारस शोधकामी माहिती आढळल्यास पोलिस ठाण्यात संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## आरटीई विद्यार्थ्यांच्या पालकांकडून पाटील शाळेबाबत तक्रारी

### मनमानी कारभार बंद करण्याची बहुजन समाज पार्टीची मागणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पाटील बाल मंदिर विद्यालय मोहने या शाळेसंदर्भात आरटीई पालकांकडून अनेक तक्रारी बहुजन समाज पार्टीला प्राप्त झाल्या आहेत. यात मुख्यतः पाटील शाळेत आरटीईच्या विद्यार्थ्यांना नियमांप्रमाणे शैक्षणिक साहित्य मोफत दिले जात नाही व त्यांना शैक्षणिक साहित्य शाळेतूनच विकत घेण्यासाठी दबाव टाकला जातो तसेच बहुजन समाज पार्टीच्या कार्यकर्त्यांकडे तक्रार करण्यासाठी सुद्धा अडवल जात आहे.

शाळेचे मुख्य संस्था चालक बी एन पाटील आरटीईच्या पालकांना धमकावत असल्याचा आरोप बहुजन समाज पार्टीने केला असून अशाप्रकारे धमकावून आरटीई विद्यार्थ्यांचे हक्क व अधिकार हिसकावून घेत आहेत. त्यामुळे याविरोधात बहुजन समाज पार्टी व आरटीई पालकांनी कल्याण डोंबिवलीचे शिक्षण विस्तार अधिकारी विजय सरकटे व केडीएमसी उपायुक्त शिक्षण विभाग संजय जाधव यांची भेट घेतली.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन लवकरात लवकर पाटील बाल मंदिर विद्यालय या शाळेवर योग्य ती कारवाई करावी अन्यथा बहुजन समाज पार्टी कडून तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा बहुजन समाज पार्टी चे कल्याण पश्चिम विधानसभा अध्यक्ष प्रदिप सोनवणे यांनी दिला आहे.

दरम्यान त्रिदल एज्युकेशन सोसयटी संस्थेचे संचालक बी. एन. पाटील यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, पुस्तके शाळेतून खरेदी करण्याबाबत सक्ती नसून बाहेरून खरेदी केली तरी चालतील. आरटीई अंतर्गत प्रवेश हा शासन अमंलबजावणी असून त्यानुसार प्रवेश दिला जातो. यासंदर्भीत आरोपात तथ्य नाही.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

# भाजपाच्या संघटनात्मक बांधणीला नवे बळ!



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : आजपासून भारतीय जनता पक्षाच्या जिल्हाध्यक्ष, मंडल अध्यक्ष व जिल्हा मोर्चा अध्यक्ष यांच्या विभागीय बैठकींना प्रारंभ झाला. या अनुषंगाने ठाणे-कोकण विभागाची आढावा बैठक आज मुंबईतील प्रदेश कार्यालयात संपन्न झाली. आज ठाणे शहर, ठाणे ग्रामीण, रत्नागिरी उत्तर-दक्षिण, मिरा-भाईंदर, वसई-विरार, भिवंडी, नवी मुंबई, रायगड उत्तर-दक्षिण, कल्याण, उल्हासनगर, सिंधुदुर्ग, पालघर आदी जिल्ह्यांच्या संघटनात्मक बैठका उत्साहात पार पडल्या.

या बैठकीत मंडल कार्यकारिणी, मंडल पुनर्रचना, बूथ समित्या, शक्ती केंद्र प्रमुखांची अद्ययावत यादी व प्रस्तावित जिल्हा कार्यकारिणी यांचा सखोल आढावा घेण्यात आला.

या बैठकीला प्रदेश महामंत्री आमदार विक्रांत पाटील, प्रदेश महामंत्री राजेश पांडे, प्रदेश महामंत्री ॲड. माधवीताई नाईक, संघटन मंत्री रवि अनासपुरे, विभागीय संघटन मंत्री हेमंत म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

## डिजिटल क्रांतीचे नेतृत्व करणारा 'महाराष्ट्र'च ! - रवींद्र चव्हाण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या #DigitalIndia या दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेमुळे भारतात एक भव्य डिजिटल क्रांती घडून येत आहे. आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे नेतृत्व आणि भाजपा-महायुतीची दूरदृष्टी यामुळे महाराष्ट्र आज UPI व्यवहारांमध्ये देशात पहिल्या स्थानावर आहे! मे २०२५ मध्ये संपूर्ण भारतात झालेल्या डिजिटल व्यवहारांपैकी तब्बल १३.१९% व्यवहार महाराष्ट्रात झालेत.नवभारताच्या आर्थिक परिवर्तनाचे नेतृत्व करणाऱ्या महाराष्ट्राचे हे यश आहे. अशी प्रतिक्रिया प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिली आहे.

प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर(तानसा), ता.शहापूर, जि. ठाणे



उपासनारुपी साधनांची जोड नसलेल्या व्यक्तींची बुद्धी स्थिर नसते. परमेश्वराविषयी प्रीतीभावना, भक्ती नसणाऱ्या नास्तिक मनुष्याला शांतीही नसते, अशा अशांत व्यक्तीस सुख कुठून लाभेल? कारण जसे सोसाट्याचा वारा सुटला असता पाण्यावर तरंगणारी नौका वाऱ्याच्या दिशेनुसार व वेगानुसार भरकटते तसेच विषयांत भरकटणाऱ्या इंद्रियांपैकी ज्या बरोबर मन राहते त्या मनावर नियंत्रण न राहता ते मन सातत्याने विषय भोगात गुंतले असता बुद्धीचा नाश होऊन साधकाचे पतन होते.

गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज

# केंद्र सरकारच्या योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करा

## - खा. श्रीरंग बारणे दिशा' समितीची बैठक संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



रायगड : केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांची जिल्हा प्रशासनाने काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. यामध्ये कोणताही हजगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही असे निर्देश दिशा समितीचे अध्यक्ष खासदार श्रीरंग बारणे व सहअध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी दिले.

रायगड जिल्ह्यातील केंद्रीय योजनांच्या प्रगती आढावा घेण्यासाठी सोमवारी जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण अर्थात 'दिशा' समितीची बैठक नियोजन समिती सभागृहात पार पडली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी खासदार श्रीरंग बारणे तर सह अध्यक्षस्थानी खा. सुनील तटकरे हे होते. बैठकीला खा. धैर्यशील पाटील, आ महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आचल दलाल, पनवेल मनपा आयुक्त मंगेश चितळे,अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे, प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत प्रधानमंत्री ग्राम सडक योजना आणि मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामांचा आढावा घेण्यात आला. अनेक कामे अपूर्ण अवस्थेत आहेत. या प्रकरणी दोषी असणाऱ्या ठेकेदारावर काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्यात यावी तसेच आवश्यकते नुसार फेर निविदा करण्यात यावी असे निर्देश खा श्री तटकरे यांनी यावेळी दिले. तसेच ही सर्व कामे प्राधान्य क्रमाने पूर्ण करावीत. सर्व सामान्यांना पाणीपुरवठा,आवास, शिक्षण, आरोग्य, त्याचप्रमाणे इतर सुविधाही विविध योजनांच्या माध्यमातून मिळवून देण्यासाठी केंद्र शासन व राज्य शासन प्रयत्नशील आहे. सर्व विभाग, यंत्रणांनी जबाबदारीने काम करावे असे खा बारणे यांनी सांगितले. केंद्र शासनाच्या सर्व योजनांची जिल्ह्यात प्रभावी प्रसिद्धी करण्यात यावी. मोक्याच्या व प्रत्यक्ष लाभाच्या ठिकाणी ठळक पणे योजना माहिती व लाभार्थी निकष लावावेत अशा सूचनाही श्री बारणे यांनी जिल्हा प्रशासनास दिल्या.

राष्ट्रीय सामाजिक मदत कार्यक्रमंतर्गत जिल्हा आरोग्य प्रशासनाने दिव्यांग मेळावे आयोजित करून लाभ द्यावे असे निर्देश मागील बैठकीत दिले होते. परंतु त्याची पूर्तता न झाल्याने सर्व लोक प्रतिनिधी यांनी नाराजी व्यक्त केली. तात्काळ हे मेळावे आयोजित करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी व आरोग्य विभागास दिल्या.

संजय गांधी निराधार योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना मधील दिव्यांग लाभार्थी यांचा देखील समावेश असावा असेही खा तटकरे यांनी यावेळी सांगितले.

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत सार्वजनिक शौचालय यांचे उद्दिष्ट वाढविण्याबाबत निर्देश दिले होते त्याप्रमाणे या वर्षासाठी 1500 वैयक्तिक व 150 सार्वजनिक शौचालय उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. पनवेल तालुक्यातील आणि एकूणच सर्व ग्रामपंचायत हद्दीतील घनकचरा व्यवस्थापनावर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन प्रकल्प राबवावेत. तसेच जिल्ह्याला डेव्हलोपमेंट चार्जेस मिळाले तर त्यामधून जिल्हा विकासाला त्याचा फायदा होईल यावरही बैठकीत सविस्तर चर्चा झाली. तसेच विविध कंपन्याकडे सि एस आर निधी असतो हा निधी त्यांनी संबंधित कार्यक्षेत्रात देखील खर्च करण्याबाबत कळवावे असेही खा श्री बारणे यांनी सांगितले. यावेळी पाणी पुरवठ्याच्या सर्व योजनावर सविस्तर चर्चा झाली. या योजनाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधिताना देण्यात आले.प्रधानमंत्री आवास योजनेतर्गत बँका परस्पर कर्ज कपात करीत आहेत त्यांनी ही कपात तात्काळ थांबवावी असेही निर्देश श्री.बारणे यांनी दिले. खासदार धैर्यशील पाटील यांनी कांदळवन आणि बी एस एन एल नेटवर्क टॉवर या विषयी सविस्तर चर्चा केली.बैठकीत प्रधानमंत्री सुर्यघर योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, मनरेगा, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, गृहनिर्माण योजना, जलजीवन मिशन, अटल भूजल योजना, मजीप्रा, स्वच्छ भारत मिशन, राष्ट्रीय आरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, कौशल्य विकास योजना, पीएम प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, नगरपरिषदेच्या योजना यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांनी बैठकीची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

## अति.आयुक्त हर्षल गायकवाड यांनी केली केडीएमसी प्रभागातील साफसफाईची पाहणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण :पावसाळी परिस्थितीत उद्धवणा-या साथरोग निर्मुलनाबाबत केल्या जाणा-या उपाययोजनांची प्रत्यक्ष पाहणी करण्याच्या दृष्टीकोनातून महापालिकेचे अति.आयुक्त हर्षल गायकवाड यांनी आज सकाळी ८ वाजल्यापासून १/अ प्रभागातील अधिकारी कर्मचा-यांची जंतुनाशक फवारणी, कचरा संकलन, साफसफाई याबाबत आढावा बैठक घेतली आणि या बैठकीमध्ये, प्रभागनिहाय दिलेल्या कृती आराखडा प्रमाणे कामे सुरु आहेत अथवा नाही याची खातरजमा करण्यासाठी स्वत: वडवली,अटाळी, आंबिवली येथील परिसरात प्रत्यक्ष फिरुन पाहणी केली. यावेळी त्यांनी नागरिकांना पाण्याचा साठा जास्त दिवस न करणेबाबत तसेच आठवडयातून १ दिवस कोरडा दिवस पाळण्याबाबत सुचना दिल्या,तसेच सदर परिसरात घराबाहेर असलेल्या पाण्याच्या ड्रमची स्वत: तपासणी करुन सदर ड्रम रिकामे करवून जंतुनाशक फवारणी करुन घेण्यात आली. अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी स्वत: संशयित डेंग्यु रुग्ण असलेल्या घराची व आजूबाजूच्या परिसराची पाहणी करून संबंधितांना योग्य त्या सूचना दिल्या.

सदर परिसरातील सोसायटयांच्या आवारात पावसाचे पाणी साठणार नाही याची दक्षता घेणेबाबत तसेच सदर सोसायटयां मधील घराघरात असलेल्या कुंडया, मनीप्लान्ट व तत्सम ठिकाणी साचलेल्या पाण्यात डासआळी निर्माण होऊ नये म्हणून दक्षता घ्यावी असे आवाहनही अति.आयुक्त हर्षल गायकवाड यांनी यावेळी केले.या पाहणी दौ-याच्यावेळी १/अ प्रभागाचे सहा.आयुक्त प्रमोद पाटील, स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरिक्षक उपस्थित होते.

## राज्य शासनाच्या 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' साठी प्रवेशिका पाठविण्याकरिता मुदतवाढ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे.

या स्पर्धेसाठी दि.1 जानेवारी 2024 ते 31 डिसेंबर 2024 पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दि.31 जानेवारी 2025 असा होता. आता या पुरस्कारासाठी प्रवेशिका मागविण्याकरिता दि.19 जुलै 2025 पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळ मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-32 येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने http://dgipr.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

## कल्याण-डोंबिवलीत बार, परमिटरूमचा बंद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : महाराष्ट्रातील हॉटेल बार मालकांनी राज्य सरकारच्या मद्यावरील करवाढीच्या निर्णयाविरोधात आज राज्यव्यापी संप पुकारला. या बंदमध्ये सुमारे 22 हजार हॉटेल्स आणि बार यांचाही सहभाग आहे. तर कल्याण-डोंबिवली मधील सर्व बार हॉटेल यांनी एक दिवसीय बंद पुकारला असून राज्य सरकारच्या मद्यावरील करवाढीला विरोध करत यांचा निषेध हॉटेल ओनर्स असोसिएशन डोंबिवली केला असून त्यांनी आज एक बैठक घेत सरकारने हा वाढीव कर रद्द करावा अशी मागणी केली. तर याबाबतचे पत्र भाजप प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना देणार आहोत असे हॉटेल ओनर्स असोसिएशन डोंबिवली अजित शेट्टी यांनी सांगितले. बैठकिला अध्यक्ष अजित शेट्टी, सेक्रेटरी सत्येश शेट्टी, प्रभाकर शेट्टी, सूकुमार नायक, राजू भंडारी, सुकेश शेट्टी, किशोर शेट्टी, विठ्ठल शेट्टी, वीजीत शेट्टी सचिन शेट्टी, आणि हॉटेल मालक उपस्थिती होते.

राज्य शासनाने मद्य विक्रीवरील व्हॅट ५ टक्क्यांवरून १० टक्के केले, परवाना शुल्कात १५ टक्के वाढ केली आणि भारतीय बनावटीच्या परदेशी मद्यावर उत्पादन शुल्कात ६० टक्क्यांनी वाढ केली आहे. ही कर वाढ रद्द करावी अशी मागणी हॉटेल ओनर्स असोसिएशन डोंबिवली केली आहे. या करवाढी विरोध करण्यासाठी आणि सरकारचे लक्ष वेधण्यासाठी बार आणि हॉटेल व्यावसायिकांनी आज एक दिवस बार बंद ठेवले आहेत.

### डोंबिवलीत पार पडली हॉटेल्स आणि बार मालकांची बैठक

हॉटेल ओनर्स असोसिएशन डोंबिवलीची बैठक आज डोंबिवली मॉर्डन प्राईड हॉटेल येथे पार पडली. यात कल्याण डोंबिवली मधील हॉटेल व्यावंसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी व्यावंसायिक यांनी आपल्या अडचणी मांडल्या. तर याबाबतचे एक पत्र आम्ही भाजप प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना देणार आहोत आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांना पत्र देणार आहोत असे सांगण्यात आले.

दरम्यान जर हें कर वाढले तर मोठे नुकसान हॉटेल व्यावसायिकांचे होणार असून, बार बंद पडण्याची शक्यता वाढली असून रोजगारांवर सुद्धा यांचा फटका पडणार असल्याचे हॉटेल ओनर्स असोसिएशन डोंबिवली सेक्रेटरी सत्येश शेट्टी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. तर हॉटेल व्यवसायिक गिरीश शेट्टी यांनी सांगितले की परमिट रूम आणि वाईन शॉप मधील करात ताफावत असल्याने ग्राहक हें ढाबे, चायंनिज फूडच्या गाड्यावर दारू घेऊन जाऊन पितील, तसेच उघड्यावर सुद्धा दारू पिण्याचे प्रमाण वाढेल आणि सरकार टॅक्स सुद्धा कमी मिळेल म्हणून ही कर वाढ रद्द करावी असे सांगितले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.